सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५

(१० ऑक्टोबर १९९७ पर्यंत सुधारित)

# Maharashtra Act No. XVI of 1975

# The Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975

**(As modified up to 10th October 1997)**

[किंमत : रुपये १०.००]

## महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५

### अनुक्रमणिका

उद्देशिका.

कलमे.


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | ५ |
| २. | व्याख्या | ५ |
| ३. | कर बसविणे व त्याची आकारणी | ६ |
| ४. | कर्मचाऱ्यांच्या वतीने कर वजा करण्याची व तो भरण्याची मालकाची जबाबदारी | ७ |
| ५. | नोंदणी व नावनोंदणी | ७ |
| ६. | विवरणे | ९ |
| ७. | मालकांवरील कराचे निर्धारण | ९ |
| ८. | कर भरणे | १० |
| ९. | वेतन कर वजा करण्यात किंवा देण्यात कसूर केल्याचे परिणाम | ११ |
| १०. | कर न भरण्याबद्दल शास्ती | ११ |
| १०अ. | विवक्षित प्रकरणी कर देण्याच्या पात्रतेसंबंधात विशेष तरतूद | १२ |
| ११. | कर इत्यादींची वसुली | १२ |
| १२ | अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरण | १३ |
| १२अ. | विवक्षित वादग्रस्त प्रश्नांचा निर्णय | १४ |
| १३. | अपील | १४ |
| १४. | पुनरीक्षण | १५ |
| १५. | चुकांची दुरुस्ती | १५ |
| १६. | लेखे | १६ |
| १७. | वसुलीची विशेष पद्धत | १६ |
| १८. | लेखे व दस्तऐवज सादर करणे व त्यांची तपासणी आणि जागांची झडती | १७ |
| १९. | जादा प्रदानांचा परतावा | १७ |
| २०. | अपराध आणि शास्ती | १७ |
| २१. | कंपन्यांनी केलेले अपराध | १७ |
| २२. | कार्यवाही हस्तांतरित करण्याचा अधिकार | १८ |
| २३. | अपराध आपसात मिटवणे | १८ |
| २४. | हजर राहण्यास भाग पाडणे, इत्यादीबाबतचे अधिकार | १८ |
| २५. | कार्यवाहीस रोध | १८ |
| २६. | प्रत्यायोजनाचा अधिकार | १९ |
| २७. | नियम करण्याचा अधिकार | १९ |
| २७अ. | सूट | १९ |
| २८. | विवक्षित अधिनियमांची सुधारणा | २१ |
| २९. | महसुलातील तुटीबद्दल स्थानिक प्राधिकरणांना अनुदाने | २१ |
| ३०. | महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये स्थापन केलेल्या निधीत कराच्या निव्वळ उत्पन्नाइतकी रक्कम व अनुरूप अंशदान देणे. | २२ |
| | अनुसूची एक | २३ |
| | अनुसूची दोन | २७ |

# सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६[1]

**[महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५]**

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१* (१ नोव्हेंबर १९७६)†

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० (२६ जानेवारी १९७९)†

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ (२० एप्रिल १९८२)†

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ (१६ ऑगस्ट १९८५)†

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ (३ जुलै १९८६)†

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ (२० एप्रिल १९८७)†

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ (२२ एप्रिल १९८८)†

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ (१ एप्रिल १९८९) †

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४** (२८ ऑगस्ट १९९०)†

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी महाराष्ट्र शासन **राजपत्र**, १९७५, भाग ५, पृष्ठ २७८ पहा.

*सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम " (२) कलम १२, १ एप्रिल १९७५ रोजी अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

†ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शवते.

**सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम २६ पुढीलप्रमाणे वाचावे :—

" २६. (१) कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा विधिग्राह्य
१९५९ चा अन्य कोणत्याही प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात/हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही करण व
मुंबई ५१. अंतर्भूत असले तरी, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९, महाराष्ट्र कार्यकंत्राटांच्या अंमल- व्यावृत्ती.
बजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित)
१९८९ चा अधिनियम, १९८९, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर
महाराष्ट्र २६. अधिनियम, १९७५ आणि महाराष्ट्र (हॉटेले व निवासगृहे यामध्ये पुरविण्यात येणाऱ्या) ऐषआराम
१९७५ चा सेवांवरील कर अधिनियम, १९८७ (या कलमात यापुढे ज्यांचा " उक्त अधिनियम " असा एकत्रित
महाराष्ट्र १६. निर्देश करण्यात आला आहे) या अन्वये केलेली कोणतीही कराची आकारणी, फेरआकारणी
१९८७ चा तो बसवणे किंवा गोळा करणे किंवा देय असलेले, लादलेले, दिलेले किंवा वसूल केलेले किंवा
महाराष्ट्र ४१. बसविण्याचे, गोळा करण्याचे, लादण्याचे, देण्याचे किंवा वसूल करण्याचे, अभिप्रेत असलेले जे सर्व कर, शास्ती व कोणतेही व्याज जर या अधिनियमाद्वारे उक्त अधिनियमामध्ये करण्यात आलेल्या कोणत्याही सुधारणा ह्या उक्त अधिनियमान्वये ज्या कालावधीकरिता असा कर अथवा अशी शास्ती वा व्याज हे सर्व आकारण्यात आले असेल, गोळा करण्यात आले असेल, लादण्यात आले असेल, देय झाले असेल किंवा वसूल करण्यात आले असेल त्या कालावधीत अंमलात असत्या तर, वैधरित्या लादण्यात आले असते, गोळा करण्यात आले असते, बसविण्यात आले असते, देय झाले असते, देण्यात किंवा वसूल करण्यात आले असते असे लादण्यात, देण्यात किंवा वसूल करण्यात आलेले सर्व कर, शास्ती किंवा व्याज हे, सर्व प्रयोजनांकरिता, कायद्यानुसार बसविण्यात आल्याचे, गोळा करण्यात आल्याचे, लादण्यात आल्याचे, देय असल्याचे, दिल्याचे किंवा वसूल करण्यात आल्याचे मानण्यात येईल व ते नेहमीकरता बसवण्यात आल्याचे, गोळा करण्यात आल्याचे, लादण्यात आल्याचे, देय असल्याचे व देण्यात आल्याचे मानण्यात येईल, आणि त्यानुसार,—

(अ) कोणतेही प्राधिकरण किंवा न्यायाधिकरण यांनी कराची आकारणी, फेरतपासणी, तो बसविणे, किंवा त्याची वसुली किंवा कोणतीही शास्ती किंवा व्याज लादणे, गोळा करणे

किंवा वसूल करणे यांच्या संबंधात केलेली सर्व कृत्ये, कार्यवाह्या किंवा गोष्टी या सर्व प्रयोजनांसाठी व नेहमीकरिता कायद्यानुसार करण्यात आल्याचे मानण्यात येईल ;

(ब) अशा कोणत्याही कराच्या, शास्तीच्या किंवा व्याजाच्या परताव्यासाठी कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकाऱ्यासमोर कोणताही वाद, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही, चालविता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही ;

(क) कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा इतर प्राधिकारी अशा कोणत्याही कराच्या, शास्तीच्या किंवा व्याजाच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश काढणार नाही ;

(ड) असा कर, शास्ती किंवा व्याज यांच्या स्वरूपात मिळालेली किंवा वसूल करण्यात आलेली कोणतीही रक्कम या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी परत करण्यात आली असेल आणि या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या तरतुदी, अशा परताव्याचा आदेश ज्या तारखेस काढण्यात आला त्या तारखेस अमलात असत्या तर असा परतावा देता आला नसता—त्याबाबतीत अशाप्रकारे परत देण्यात आलेली रक्कम उक्त अधिनियमान्वये कराची थकबाकी म्हणून वसूल करता येईल;

(ई) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही वेळी या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमाच्या तरतुदी अमलात असत्या तर, त्यावेळी असा कर, शास्ती किंवा व्याज बसविण्यासाठी, लादण्यासाठी किंवा वसूल करण्यासाठी विधिग्राह्य रीत्या, करता आली असती किंवा चालू ठेवता आली असती, परंतु जी करण्यात किंवा चालू ठेवण्यात आली नव्हती किंवा लादण्यात आली नव्हती अशी कोणतीही कार्यवाही, कृती किंवा गोष्ट ही, अशा प्रारंभानंतर, उक्त अधिनियमान्वये करता येईल, चालू ठेवता येईल किंवा लादता येईल.

(२) शंकानिरसनासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टींचा अन्वयार्थ एखाद्या व्यक्तीला,—

(अ) या अधिनियमान्वये सुधारण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या तरतुदीनुसार, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कराची, शास्तीची किंवा व्याजाची कोणतीही आकारणी, फेर-आकारणी, तो बसविणे, लादणे किंवा त्याची वसुली यांच्याबाबतीत हरकत घेण्यास ; किंवा

(ब) या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या उक्त अधिनियमान्वये कर, शास्ती किंवा व्याज रूपाने तिच्याकडून देय असलेल्या रकमेपेक्षा उक्त अधिनियमान्वये तिच्याकडून अधिक भरण्यात आलेला कोणताही कर, शास्ती किंवा व्याज याच्या परताव्याची मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ याच्या कलम ३८ चे पोट-कलम (६-अ) किंवा ४३ चे पोट-कलम (३) १९५९ चा याच्या तरतुदी जेथवर लागू असतील तेथवर त्यांच्या अधीन राहून, मागणी करण्यास, प्रतिबंध मुंबई ५१. करते अशा प्रकारे लावण्यात येणार नाही.

(३) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ याच्या कलम ५७ अन्वये न्यायाधिकरणाकडे करण्यात १९५९ चा आलेले आणि हा अधिनियम ज्या तारखेस अमलात आला असेल, त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या मुंबई ५१. तारखेस अनिर्णीत असलेले अर्ज हा अधिनियम जणू काही संमत झाला नव्हता असे समजून न्यायाधिकरणाकडून निकालात काढण्यात येतील.

(४) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही व्यक्ती, तिने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही गोष्ट ही या अधिनियमान्वये उक्त अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यात आल्या नसत्या तर उक्त अधिनियमान्वये अपराध ठरत नव्हती असे असल्यास त्या केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधातील अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविले जाण्यास पात्र होणार नाही; किंवा तिने केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या अशा कृतीसंबंधात, या अधिनियमाच्या लगतपूर्वी अमलात असलेल्या कायद्यान्वये तिच्यावर लादण्यात आली असती अशा शास्तीपेक्षा अधिक शास्तीस पात्र होणार नाही."

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२* (२२ फेब्रुवारी १९९१) † §
सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ (१ मे १९९२) †
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ (१ मे १९९३) †
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ (१ मे १९९४) †
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ (८ जून १९९५) †
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ (१ ऑक्टोबर १९९५) †
सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ (२९ जून १९९६) †
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०

---

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

* सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ हा सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ४ द्वारे निरसित करण्यात आला.

§ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याचे कलम ३ पुढीलप्रमाणे वाचावे :—

"३. (१) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरीही, कर, व्याज किंवा शास्ती यांची कोणतीही आकारणी, फेरआकारणी, ती बसविणे, लादणे किंवा तिची वसुली यासंबंधात १ नोव्हेंबर १९७६ पासून सुरू होणाऱ्या व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीचा दिनांक धरून त्या दिवशी संपणाऱ्या कालावधीत मुख्य अधिनियमाच्या तरतुदीन्वये अशी आकारणी, फेरआकारणी, कर बसविणे, लादणे किंवा त्याची वसुली यासंबंधात केलेली कोणतीही कार्यवाही किंवा गोष्ट ही, जणू काही अशी आकारणी, फेरआकारणी, कर बसविणे, लादणे, त्याची वसूली किंवा अशी कार्यवाही किंवा गोष्ट ही या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये उचितरित्या करण्यात आली असल्याप्रमाणे वैध व परिणामक असल्याचे मानण्यात येईल, व त्यानसार,— विधिग्राह्यकारी तरतुदी व व्यावृत्ती.

(अ) अशा कोणताही कर, व्याज किंवा शास्ती यांची आकारणी, फेरआकारणी, ती बसविणे, लादणे किंवा तिची वसुली यासंबंधात राज्य शासन किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा इतर कोणताही प्राधिकारी यांनी केलेल्या सर्व कृती, कार्यवाही किंवा गोष्टी या, सर्व प्रयोजनासाठी, कायद्यानुसार असल्याचे आणि नेहमीकरिता त्या तशा करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल;

(ब) असा भरलेला किंवा वसूल केलेला कोणताही कर, व्याज किंवा शास्ती यांच्या परताव्यासाठी, कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणासमोर, अधिकाऱ्यासमोर किंवा इतर प्राधिकाऱ्यासमोर कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही, चालविता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही; आणि

(क) कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, अधिकारी किंवा इतर प्राधिकारी यांना असा कोणताही कर, व्याज किंवा शास्ती यांच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश यांची अंमलबजावणी करता येणार नाही.

(२) शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीचा अर्थ, ती एखाद्या व्यक्तीला,—

(अ) या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही कर, व्याज किंवा शास्ती याची कोणतीही आकारणी, फेरआकारणी, कर बसविणे, लादणे किंवा त्याची वसुली यांना हरकत घेण्यास, किंवा

(ब) या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये तिच्याकडून कर, व्याज किंवा शास्ती यांच्या रुपाने देय असलेल्या कराच्या, व्याजाच्या किंवा शास्तीच्या रकमेहून तिने अधिक भरलेल्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यास प्रतिबंध करणारी आहे असा लावण्यात येणार नाही.

(३) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही व्यक्ती, तिने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या, कोणत्याही गोष्टीच्या संबंधातील कोणत्याही अपराधासाठी अशी कृति किंवा अकृती ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या नसत्या तर, मुख्य अधिनियमाअन्वये अपराध ठरली नसती तर, सिद्धदोष ठरवली जाण्यास पात्र ठरणार नाही अथवा कोणतीही व्यक्ती ही, या अधिनियमास प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या कायद्यान्वये, अशा कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधात तिला जी शिक्षा देण्यात आली असती त्यापेक्षा अधिक शिक्षा दिली जाण्यास पात्र ठरणार नाही."

**राज्याच्या हितासाठी व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावर कर बसविणे व तो वसूल करणे यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य शासनाची रोजगार हमी योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली अतिरिक्त साधनसंपत्ती उभारण्याच्या दृष्टीने, राज्याच्या हितासाठी व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावर कर बसवणे व तो वसूल करणे आणि रोजगार हमी निधी स्थापन करणे आणि तत्संबंधित इतर बाबीसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक १ एप्रिल १९७५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(अ) "आयुक्त" याचा अर्थ कलम १२ अन्वये नियुक्त केलेला व्यवसाय कर, आयुक्त असा आहे व त्यात त्या कलमान्वये नियुक्त केलेला व्यवसाय कर अपर आयुक्त, (कोणताही असल्यास) याचा समावेश होतो;

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

(ब) "महानगरपालिका क्षेत्र" याचा अर्थ मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ या अन्वये रचना केलेल्या महानगरपालिकेच्या हद्दींमधील क्षेत्र असा आहे;

[१][(बअ) "कर्मचारी" याचा अर्थ, पगार किंवा मजुरी यावर कामावर नेमलेली व्यक्ती असा आहे आणि त्यामध्ये—

(एक) केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य शासन किंवा रेल्वे निधी यांच्या महसुलातून वेतन मिळणारा शासकीय कर्मचारी;

(दोन) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या संस्थेत—मग ती विधि संस्थापित असो किंवा नसो—आणि अशा संस्थेचे मुख्यालय राज्याच्या बाहेर असले तरी राज्याच्या कोणत्याही भागात कार्य करीत असलेल्या संस्थेच्या नोकरीत असलेली कोणतीही व्यक्ती;

(तीन) वरील बाब (एक) आणि (दोन) यामध्ये समाविष्ट नसलेल्या एखाद्या मालकाच्या कोणत्याही नोकरीत असलेली कोणतीही व्यक्ती;

यांचा समावेश होतो; ]

(क) एखाद्या मालकाच्या नियंत्रणाखाली राहून नियमित तत्त्वावर कोणताही पगार किंवा कोणतीही मजुरी उपार्जित करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संबंधात "मालक", याचा अर्थ अशा पगाराचे किंवा मजुरीचे संवितरण करण्यासाठी जबाबदार असलेली व्यक्ती किंवा अधिकारी असा आहे व त्यामध्ये, कार्यालय प्रमुख किंवा कोणताही आस्थापना प्रमुख तसेच मालकाचा कोणताही व्यवस्थापक किंवा एजंट याचा समावेश होतो;

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम २(अ) अन्वये खंड (बअ) समाविष्ट करण्यात आला.

[१][(कअ) "गुंतलेला" या शब्दप्रयोगाचा कोणताही व्यवसाय, व्यापार, आजीविका किंवा नोकरी या संबंधातील अर्थ त्यात पूर्णपणे किंवा अन्यथा गुंतलेला असा आहे, मग अशा पेशापासून अशा व्यक्तीला कोणताही आर्थिक लाभ किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा लाभ प्रत्यक्षात मिळत असो वा नसो;]

(ड) "महिना" याचा अर्थ, ब्रिटीश कॅलेंडर नुसार गणना करण्यात येते असा महिना असा आहे;

(ई) "व्यक्ती" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, आजीविकेत किंवा नोकरीत [२][सक्रियपणे किंवा अन्यथा] सहभागी असलेली कोणतीही व्यक्ती असा आहे व त्यामध्ये अशा रीतीने व्यवसाय करीत असलेले हिंदु अविभक्त कुटुंब, भागीदारी संस्था, कंपनी, महामंडळ किंवा इतर निगमनिकाय, कोणतीही संस्था, क्लब किंवा संघटना यांचा समावेश होतो, परंतु यात नैमित्तिक तत्वावर मजुरी उपार्जित करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होत नाही;

(फ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमाअन्वये विहित केलेला असा आहे;

(ग) "व्यवसाय कर" किंवा "कर" याचा अर्थ या अधिनियमान्वये व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावर बसवण्यात आलेला कर असा आहे;

(ह) "पगार" किंवा "मजुरी" यामध्ये, नियमित आधारावर कोणत्याही व्यक्तीस मिळणारे वेतन किंवा मजुरी, महागाई भत्ता व इतर सर्व पारिश्रमिके—मग ती रोख रकमेत देय असोत किंवा वस्तूच्या रूपात देय असोत—यांचा समावेश होतो व तसेच त्यामध्ये आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम १७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या पगाराऐवजी वेतनेतर प्राप्ती व नफा यांचाही समावेश होतो [३][परंतु त्यात कोणत्याही स्वरूपात आणि कोणत्याही कारणाने मिळणारा अधिलाभांश किंवा उपदान याचा समावेश होत नाही]; १९६१ चा ४३.

(आय) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची, असा आहे;

(ज) "न्यायाधिकरण" याचा अर्थ, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ याच्या कलम २१ अन्वये रचना केलेले व या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्यास नेमून दिलेली न्यायाधिकरणाची कामे पार पाडणारे महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण असा आहे; १९५९ चा मुंबई ५१.

(के) "वर्ष" याचा अर्थ, वित्तीय वर्ष असा आहे.

कर बसवणे व त्याची आकारणी. ३. (१) भारताच्या संविधानाचा अनुच्छेद २७६ आणि हा अधिनियम याच्या तरतुदींना अधीन राहून राज्याच्या फायद्यासाठी म्हणून व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावर कर बसवण्यात येईल व तो वसूल करण्यात येईल.

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २० अन्वये खंड (कअ), दिनांक ३ जुलै १९८६ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, आजीविकेत किंवा नोकरीत [1][सक्रियपणे किंवा अन्यथा] सहभागी असलेली व अनुसूची एकच्या दुसऱ्या स्तंभात उल्लेखिलेल्या वर्गांपैकी कोणत्याही वर्गाखाली येणारी प्रत्येक व्यक्ती ही उक्त अनुसूचीच्या तिसऱ्या स्तंभात अशा व्यक्तीच्या वर्गासमोर नमूद केलेल्या दराने राज्य शासनास कर देण्यास जबाबदार असेल :

परंतु, कोणत्याही एका व्यक्तीच्या बाबतीत अशा रीतीने देय असलेला कर, हा कोणत्याही वर्षी [2][दोन हजार पाचशे रुपयांपेक्षा] अधिक असणार नाही :

आणखी असे की, अनुसूची एकमधील नोंद [3][२३] ही राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशाच व्यक्तींच्या वर्गांना लागू असेल.

४. पगार किंवा मजुरी उपार्जित करणाऱ्या व्यक्तींकडून या अधिनियमान्वये देय असलेला कर तिचा मालक, तिला असा पगार किंवा मजुरी देण्यापूर्वी, अशा व्यक्तीस देय असलेल्या पगारातून किंवा मजुरीतून वजा करील व असा मालक तो अशा व्यक्तींना पगार किंवा मजुरी देईल तेव्हा — अशी वजात करण्यात आलेली असो किंवा नसो— सर्व व्यक्तींच्या वतीने कर देण्यास जबाबदार असेल :

*कर्मचाऱ्यांच्या वतीने कर वजा करण्याची व तो भरण्याची मालकाची जबाबदारी.*

परंतु, मालक हा शासनाचा अधिकारी असेल तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त जबाबदारी अशा मालकाने ज्या रीतीने पार पाडली पाहिजे ती रीत राज्य शासनास नियमांद्वारे विहित करता येईल :

[4][आणखी असे की, पगार किंवा मजुरी मिळवणारी कोणतीही व्यक्ती,—

(अ) अनुसूची एक मधील नोंद १ शिवाय अन्य एका किंवा अधिक नोंदीत समाविष्ट होत असेल आणि अशा दुसऱ्या कोणत्याही नोंदीखालील कराचा दर हा त्या अनुसूचीतील नोंद १ खालील कराच्या दरापेक्षा अधिक असेल तर; किंवा

(ब) एकाच वेळी एकापेक्षा अधिक मालकांकडे नोकरी करीत असेल;

आणि अशी व्यक्ती आपल्या मालकाला किंवा मालकांना इतर गोष्टींबाबरच, कलम ५, पोट-कलम (२) अन्वये ती स्वत:चे नाव पटावर नोंदवून घेईल आणि स्वत:च कर भरील असे घोषित करणारे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करील तर, अशा व्यक्तीचा एक किंवा अनेक मालक अशा व्यक्तीस देय असलेल्या पगारातून किंवा मजुरीतून कराची वजात करणार नाही/नाहीत आणि असा किंवा यथास्थिति असे मालक, अशा व्यक्तीच्या वतीने कर भरण्यास जबाबदार असणार नाही/नाहीत.]

५. (१) कलम ४ अन्वये [5][किंवा कलम १०-अ च्या पोट-कलम (५) अन्वये] कर भरण्यास जबाबदार असलेला प्रत्येक मालक (शासकीय अधिकारी नसणारा) विहित प्राधिकाऱ्याकडून विहित रीतीने नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करील.

*नोंदणी व नाव नोंदणी.*

---

[1]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ३ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2]सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३१ अन्वये "दोनशे पन्नास रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3]सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम २३ अन्वये '२०' या आकड्याऐवजी हा आकडा दाखल करण्यात आला.

[4]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[5]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(शा.म.मु.) एच ४४६९–२ (३,०६१–११-९७)

(२) या अधिनियमान्वये कर भरण्यास जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती (पगार किंवा मजुरी उपार्जित करणाऱ्या व जिच्या बाबतीत तिच्या मालकाकडून कर देय असेल अशा व्यक्तीखेरीज इतर) विहित प्राधिकाऱ्यांकडून विहित रीतीने नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करील.

[१][(२-अ) या कलमात आणि लगतपूर्वीच्या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी व्यक्ती ही भारतीय नागरिक असेल आणि ती, राज्याच्या कोणत्याही भागात असलेल्या कोणत्याही विदेशी राजनैतिक किंवा वाणिज्यिक कार्यालयात किंवा व्यापार आयुक्ताच्या कार्यालयात नोकरीत असेल त्या बाबतीत जर कर भरण्यास पात्र असेल तर, ती व्यक्ती पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करील आणि स्वतःच कर भरील.]

(३) नोंदणी किंवा नावनोंदणी प्रमाणपत्र मिळवणे आवश्यक असलेला प्रत्येक मालक किंवा व्यक्ती, राजपत्रात हा अधिनियम प्रथम प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, किंवा त्या तारखेस तो मालक किंवा ती व्यक्ती कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, आजीविकेत किंवा नोकरीत नसेल तर, [२][ती कर देण्यास पात्र झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत,] किंवा [३][पोट-कलम (२) किंवा (२-अ)] मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीच्या बाबतीत ती, तिच्या नावनोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या दरापेक्षा उच्च किंवा कमी दराने कर देण्यास जबाबदार झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, नोंदणी किंवा नावनोंदणी प्रमाणपत्रासाठी किंवा यथास्थिति, सुधारित नावनोंदणी प्रमाणपत्रासाठी, विहित प्राधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात अर्ज करील, व विहित प्राधिकारी, अर्ज व्यवस्थित असेल तर, असा अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत (या अधिनियमाच्या प्रारंभापासूनच्या पहिल्या वर्षी हा कालावधी नव्वद दिवसांपर्यंत वाढवण्यात येईल) असे प्रमाणपत्र त्याला किंवा तिला देईल :

[४][परंतु, ज्या बाबतीत कर देण्यास पात्र झालेल्या व्यक्तीस, कराच्या दरामध्ये सुधारणा झाल्यामुळे, नांव नोंदणी प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या दरापेक्षा उच्च किंवा कमी दराने कर द्यावा लागेल अशाबाबतीत नाव नोंदणी प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेला कराचा दर हा उपरोक्त प्रमाणे कराच्या दरात अशी सुधारणा केल्याच्या तारखेस त्यानुसार सुधारण्यात आला असल्याचे मानण्यात येईल, आणि अशी व्यक्ती सुधारित नाव नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज करीपर्यंत आणि तिला असे प्रमाणपत्र दिले जाईपर्यंत ती या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा सुधारित दराने कर देण्यास पात्र होईल.]

(४) विहित प्राधिकरण, प्रत्येक नावनोंदणी प्रमाणपत्रात, अनुसूची एक अनुसार धारकाकडून देय असलेली कराची रक्कम व ती ज्या तारखेपर्यंत द्यावयास पाहिजे ती तारीख नमूद करील व असे प्रमाणपत्र, [५][पोट-कलम (३) च्या परंतुकाच्या तरतुदींच्या अधीनतेने] कलम १० च्या प्रयोजनार्थ, मागणीसंबंधीची नोटीस म्हणून समजले जाईल.

(५) नोंदणी किंवा नावनोंदणी यासाठी जबाबदार असलेला मालक किंवा व्यक्ती, आवश्यक त्या मुदतीच्या आत अशा प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यात [६]* * * कसूर करील त्या बाबतीत, विहित प्राधिकाऱ्याकडे त्याला किंवा तिला स्वतःचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी शास्ती लादता येईल.

---

[१]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४(अ) अन्वये पोट-कलम (२-अ) समाविष्ट करण्यात आले.

[२]वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २(अ) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[५]वरील अधिनियमाच्या कलम ५(ब) अन्वये हे शब्द, कंस व आकडे समाविष्ट करण्यात आले.

[६]सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३२(अ) अन्वये "बुद्धिपुरस्सर" हा शब्द वगळण्यात आला.

(६) नोंदणी किंवा नावनोंदणी यासाठी जबाबदार असलेल्या मालकाने किंवा व्यक्तीने, या कलमान्वये सादर केलेल्या कोणत्याही अर्जात [१]* * खोटी माहिती दिली असेल अशा बाबतीत, विहित प्राधिकाऱ्याला, त्याला किंवा तिला स्वतःचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी शास्ती लादता येईल.

६. (१) या अधिनियमान्वये नोंदणी झालेला प्रत्येक मालक, त्याने दिलेले पगार व मजुरी व त्यांच्याबाबतीत [२][* *] त्याने वजा केलेली कराची रक्कम दर्शविणारे [३][विवरण, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा कालावधींसाठी आणि अशा तारखांपर्यंत] विहित प्राधिकाऱ्याला सादर करील. विवरणे.

(२) विवरणानुसार देय असलेली कराची पूर्ण रक्कम दिल्याच्या पुराव्यादाखल अशा प्रत्येक विवरणासोबत कोषागाराचे चलान जोडण्यात येईल, व रक्कम दिल्याबद्दलचा पुरावा सोबत नसलेले विवरण सादर केल्यास ते विवरण योग्यरीत्या दाखल केले असल्याचे मानण्यात येणार नाही.

(३) आवश्यक त्या मुदतीच्या आत ते विवरण दाखल करण्यात मालक [४][वाजवी कारणाशिवाय कसूर करील] त्या बाबतीत, विहित प्राधिकाऱ्यास अशा मालकास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी पाच रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी शास्ती त्याच्यावर लादता येईल.

७. (१) कोणत्याही मालकाने दाखल केलेले विवरण बिनचूक व पूर्ण आहे अशी विहित प्राधिकाऱ्याची खात्री झाली तर तो ते विवरण स्वीकारील. मालकांवरील कराचे निर्धारण.

(२) (अ) दाखल केलेले विवरण बिनचूक व पूर्ण असल्याची विहित प्राधिकाऱ्याची खात्री झाली नाही तर तो, मालकावर नोटीस बजावील व नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस त्याला व्यक्तिशः किंवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत आपल्यासमोर उपस्थित होण्यास आणि विवरणाच्या पुष्ट्यर्थ लेखे व कागदपत्रे प्रस्तुत करण्यास फर्मावील.

(ब) लेखे व कागदपत्रे यांची तपासणी केल्यानंतर, विहित प्राधिकारी मालकाकडून देय असलेली कराची रक्कम निर्धारित करील.

(क) जर मालकाने नोटिशीतील आवश्यक त्या गोष्टींचे अनुपालन करण्यात कसूर केली किंवा जर विहित प्राधिकाऱ्याच्या मते, लेखे व कागदपत्रे चुकीची किंवा अपूर्ण किंवा अविश्वासार्ह असतील तर उक्त प्राधिकारी, त्याला योग्य वाटेल अशा चौकशीनंतर, किंवा अन्यथा स्वतःच्या उत्तम निर्णयशक्तीनुसार, देय कराचे निर्धारण करील.

[५][(२-अ) कोणत्याही मालकाकडून देय असलेल्या कराच्या रकमेचे निर्धारण ज्या वर्षासाठी ती कर देण्यास पात्र असेल त्या प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्रपणे करण्यात येईल :

परंतु, विहित प्राधिकाऱ्यास, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून आणि कारणे लेखी नमूद करून कोणत्याही मालकाकडून येणे असलेल्या कराचे निर्धारण वर्षाच्या कोणत्याही भागात करता येईल :

---

[१]सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३२ (ब) अन्वये "जाणूनबुजून" हे शब्द वगळण्यात आले.

[२]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, याच्या कलम ५ (अ) (दोन) अन्वये "त्या महिन्याच्या लगतपूर्ववर्ती महिन्यात" हा मजकूर वगळण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम ५ (अ) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]वरील अधिनियमाच्या कलम ६(अ) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

आणखी असे की, एखाद्या नोंदणीकृत मालकाने वर्षाच्या कोणत्याही भागासाठी विवरण सादर करण्यात कसूर केल्यास, विहित प्राधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल तर, अशा मालकाकडून येणे असलेल्या कराचे, अशा वर्षाच्या वेगवेगळया भागांसाठी स्वतंत्रपणे निर्धारण करता येईल.]

(३) जर मालकाने आपली नोंदणी करवून घेण्यात [१]* * * कसूर केली किंवा नोंदणी करवून घेतल्यानंतर त्याने कोणतेही विवरण दाखल करण्यात कसूर केली तर, विहित प्राधिकारी, मालकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्या-नंतर किंवा अन्यथा, स्वतःच्या उत्तम निर्णयशक्तीनुसार, देय कराची रक्कम निर्धारित करणारा आदेश काढील.

(४) अशा रीतीने निर्धारित केलेली कराची रक्कम, विहित प्राधिकाऱ्याकडून मागणीची नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत भरण्यात येईल.

कर भरणे. ८. (१) या अधिनियमाअन्वये देय असलेला कर विहित रीतीने भरण्यात येईल.

(२) नावनोंदणी झालेल्या व्यक्तींकडून, त्यांच्या नावनोंदणी प्रमाणपत्रात विहित केल्याप्रमाणे प्रत्येक वर्षासाठी देय असलेली कराची रक्कम—

| | |
|---|---|
| (अ) जिची नावनोंदणी वर्षाच्या प्रारंभापूर्वी किंवा वर्षाच्या [२][३१ मे] रोजी किंवा तत्पूर्वी झाली असेल अशा व्यक्तीच्या बाबतीत. | [४][त्या वर्षाच्या ३० जून पूर्वी किंवा आयुक्त राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या वर्षाच्या संबंधात विनिर्दिष्ट करील अशा नंतरच्या तारखेपूर्वी.] |
| (ब) वर्षाच्या [३][३१ मे] नंतर नावनोंदणी झालेल्या व्यक्तीच्या बाबतीत. | नावनोंदणीच्या तारखेपासून एक महि-न्याच्या आत. |
| [५][(क) जिची नावनोंदणी झालेली आहे आणि ज्या दराने ती कर देण्यास पात्र आहे, त्या कराच्या दरात सुधारणा करण्यात आली आहे, अशा व्यक्तीच्या बाबतीत, | अशी सुधारणा केल्याच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत.] |

भरली जाईल.

[६][(३) (अ) नियमांच्या अधीन राहून नावनोंदणी प्रमाणपत्र धारण करणारी व दरसाल रुपये [७][१०००] या दराने कर भरण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये कर भरण्याचे तिचे दायित्व, ५ वर्षांच्या एकूण सलग कालावधीसाठी कराच्या अशा दराच्या चारपटी-इतकी ठोक रक्कम त्या वर्षाच्या ३० जून रोजी किंवा त्यापूर्वी आगाऊ भरून पूर्ण करू शकेल.

---

[१]सन १९७६ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, याच्या कलम ६(ब) अन्वये "हेतुपुरस्सर" हा शब्द वगळण्यात आला.

[२]सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २(अ) (एक) अन्वये "३१ ऑगस्ट" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम २(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ८ अन्वये "त्या वर्षाच्या ३० जून पूर्वी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये खंड (क) जादा दाखल करण्यात आला.

[६]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ६ अन्वये पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

[७]सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ३३ अन्वये '८५०' या आकड्या ऐवजी हे आकडे समाविष्ट करण्यात आले.

(ब) जर अशा कोणत्याही ठोक रकमेचा भरणा अशा दिनांकाला किंवा त्यापूर्वी न करता तो वर्षअखेरीस किंवा त्यापूर्वी करण्यात आला तर अशी व्यक्ती खंड (अ) अन्वये देय असलेल्या ठोक रकमेबरोबरच अशा विलंबाच्या कालावधीसाठी दरमहा रुपये [१][४०] या दराने जादा ठोक रक्कम भरण्यास पात्र असेल.

(क) कराऐवजी ज्या व्यक्तीने अशी ठोक रक्कम भरलेली असेल त्या व्यक्तीने देय असलेल्या कराच्या दायित्वामध्ये, कराच्या दरातील कोणतीही वाढ किंवा घट यामुळे बदल होणार नाही.]

९. (१) जर (शासनाचा अधिकारी नसेल असा) मालक, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक असल्याप्रमाणे [२][ कर भरण्यात कसूर करील], तर त्याच्यावर जे कोणतेही इतर परिणाम होतील व दायित्वे पडतील त्यास बाध न आणता, ती, कराच्या बाबतीत, कसूरदार कंपात्र व्यक्ती म्हणून समजली जाईल. **वेतन कर वजा करण्यात किंवा देण्यात कसूर केल्याचे परिणाम.**

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींस बाध न आणता [३][त्या पोट-कलमामध्ये निर्दिष्ट केलेला मालक] जेवढ्या कालावधीत कर अदत्त राहील तेवढ्या कालावधीत [४][प्रत्येक महिन्यासाठी देय असलेल्या] कराच्या रकमेवर २ टक्के दराने सरळ व्याज भरण्यास [३][पात्र ठरेल.]

[५][ (२-अ) ज्या बाबतीत कलम ७ अन्वये निर्धारित केलेली किंवा कलम १३ अथवा कलम १४ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशानुसार देय असल्याचे आढळून आलेली कराची रक्कम ही मालकाने दिलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत, मालक हा, कराच्या फरकाच्या रकमेवर, पोट-कलम (२) मध्ये विहित केलेल्या दराने व रीतीने सरळ व्याज भरण्यास पात्र ठरेल.]

(३) जर एखादी नावनोंदणी झालेली व्यक्ती, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक असल्याप्रमाणे कर भरण्यात कसूर करील तर ती, पोट-कलम (२) मध्ये विहित केलेल्या दराने व त्या रीतीने, सरळ व्याज भरण्यास पात्र ठरेल.

[६][ (४) आयुक्त विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधीन राहून आणि लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठी या कलमान्वये कोणत्याही कालावधीच्या संबंधात देय असलेले संपूर्ण व्याज किंवा त्याचा कोणताही भाग माफ करू शकेल.]

१०. जर नावनोंदणी झालेली व्यक्ती किंवा नोंदणी झालेला मालक वाजवी कारणाशिवाय मागणीच्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या आवश्यक त्या मुदतीत किंवा तारखेपर्यंत कराची कोणतीही रक्कम भरण्यात कसूर करील तर, विहित प्राधिकाऱ्यास, तिला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, देय कराच्या रकमेच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही इतकी शास्ती तिच्यावर लादता येईल. **कर न भरण्याबद्दल शास्ती.**

---

[१]सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, याच्या कलम १८ द्वारे '३०' याऐवजी हा आकडा दाखल करण्यात आला.

[२]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम ७(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ४अ अन्वये "प्रत्येक महिन्यासाठी किंवा महिन्याच्या भागासाठी देय असलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]वरील अधिनियमाच्या, कलम ४(ब) अन्वये पोट-कलम (२-अ) समाविष्ट करण्यात आले.

[६]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ७ अन्वये पोट-कलम ४ समाविष्ट करण्यात आले.

विवक्षित प्रकरणी कर देण्याच्या पात्रतेसंबंधात विशेष तरतूद.

[1][१०-अ. (१) या अधिनियमाच्या कलम ४ अन्वये कर देण्यास पात्र असणारा एखादा मालक मरण पावल्यास, त्याचा वैध प्रतिनिधि, या अधिनियमाखाली अशा मालकाकडून देय असलेला कर (कोणतीही शास्ती व व्याज यांसह), असा कर, मयत मालक, ज्या रीतीने व ज्या मर्यादेपर्यंत देण्यास पात्र ठरला असता त्याच रीतीने व त्याच मर्यादेपर्यंत देण्यास पात्र असेल---मग असा कर (कोणतीही शास्ती आणि व्याज यांसह) मालकाच्या मृत्यूपूर्वी आकारण्यात आलेला परंतु अदत्त राहिलेला असो किंवा मालकाच्या मृत्यूनंतर आकारण्यात आलेला असो.

स्पष्टीकरण ---या पोट-कलमात, " वैध प्रतिनिधी " या शब्दप्रयोगाला " दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ " याच्या कलम २, खंड (११) मध्ये त्यास जो अर्थ नेमून देण्यात आला असेल तोच अर्थ असेल. १९०८ चा ५.

(२) या अधिनियमाच्या कलम ४ अन्वये कर देण्यास पात्र असलेला मालक, हा हिंदू अविभक्त कुटुंब असेल आणि संयुक्त कुटुंबाची मालमत्ता निरनिराळ्या व्यक्तींमध्ये किंवा व्यक्तींच्या गटांमध्ये विभागण्यात आली असेल त्याबाबतीत, प्रत्येक व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट, विभागणीच्या वेळेपर्यंत या अधिनियमाखाली मालकाकडून देय असलेला कर (कोणतीही शास्ती व व्याज यांसह) देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे पात्र असेल,---मग असा कर (कोणतीही शास्ती व व्याज यांसह) विभागणी-पूर्वी आकारण्यात आलेला परंतु अदत्त राहिलेला असो किंवा विभागणीनंतर आकारण्यात आलेला असो.

(३) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला मालक, एखादी भागीदारी संस्था असेल आणि ती विघटित करण्यात आली असेल अशा बाबतीत, जी अशा संस्थेचा भागीदार होती अशी प्रत्येक व्यक्ती विघटनाच्या वेळेपर्यंत या अधिनियमाखालील मालकाकडून देय असलेला कर (कोणतीही शास्ती व व्याज यांसह) देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे पात्र असेल---मग असा कर (कोणतीही शास्ती व व्याज यांसह) अशा विघटनापूर्वी आकारण्यात आलेला परंतु अदत्त राहिलेला असो किंवा अशा विघटनानंतर आकारण्यात आलेला असो.

(४) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला मालक त्याच्या कार्यालयाचे किंवा आस्थापनेचे किंवा कामाचे संपूर्णपणे किंवा अंशतः हस्तांतरण करील किंवा अन्यथा त्याची विल्हेवाट लावील, किंवा त्याच्या नोकरीच्या व्यवस्थेत कोणताही बदल करील व त्याच्या परिणामी, त्या कार्यालयात, आस्थापनेत, किंवा कामात किंवा त्याच्या भागात इतर कोणतीही व्यक्ती त्याच्या जागी येईल तर त्या बाबतीत, तो मालक व त्याच्या जागी येणारी व्यक्ती, अशा हस्तांतरणाच्या, विल्हेवाट लावण्याच्या किंवा कामात बदल घडवून आणण्याच्या वेळेपर्यंत, या अधिनियमाखाली त्या मालकाकडून येणे असलेला कर (कोणतीही शास्ती व व्याज यांसह) देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे पात्र असेल---मग असा कर (कोणतीही शास्ती व व्याज यांसह) अशा हस्तांतरणाच्या, विल्हेवाट लावण्याच्या किंवा बदलाच्या पूर्वी आकारण्यात आलेला परंतु अदत्त राहिलेला असो किंवा त्यानंतर आकारण्यात आलेला असो.

(५) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेल्या मालकाच्या कार्यालयात, आस्थापनेत किंवा कामात पोट-कलम (४) मध्ये वर्णन केलेल्या रीतीने अन्य कोणतीही व्यक्ती त्याच्या जागी येईल त्याबाबतीत, अशी व्यक्ती,---

(अ) कलम तीन मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी अशा रीतीने त्या मालकाच्या जागी आल्याच्या तारखेपासूनच्या काळाकरिता कर देण्यास पात्र असेल, आणि

(ब) ती नोंदणी प्रमाणपत्र आधीच धारण करीत नसेल तर, अशा मालकाच्या जागी आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज करील.]

कर इत्यादींची वसुली.

११. या अधिनियमाखालील कर, शास्ती, व्याज व फी यांची सर्व थकबाकी, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुली योग्य असेल.

---

[1]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ५ अन्वये, कलम १०-अ समाविष्ट करण्यात आले.

१२. (१) (अ) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता, राज्य शासनास,—

अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरण.

(एक) संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता, आयुक्त, व्यवसाय कर, म्हणून एक अधिकारी ;

(दोन) राज्य शासनास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, अपर आयुक्त, व्यवसाय कर म्हणून एक किंवा अधिक अधिकारी ;

(तीन) राज्य शासनास आवश्यक वाटेल तितके उप आयुक्त, व्यवसाय कर, [१][वरिष्ठ सहायक आयुक्त व्यवसाय कर], सहायक आयुक्त, व्यवसाय कर व व्यवसाय कर अधिकारी आणि इतर अधिकारी व व्यक्ती (आवश्यक वाटेल अशा पदनामासह) यांची नियुक्ती करता येईल.

(ब) वरील खंड (अ) च्या परिच्छेद (दोन) किंवा (तीन) अन्वये नियुक्ती केलेला अधिकारी, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्याच्या अधिकारितेत असल्याचे विनिर्दिष्ट करील अशा क्षेत्राच्या मर्यादांमध्ये, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली त्याला प्रदान करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि त्यांवर लादण्यात येतील अशी कर्तव्ये पार पाडील.

(क) कर बसविण्याशी व तो गोळा करण्याशी संबंधित अशा या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची योग्यरीत्या अंमलबजावणी होण्यासंबंधीच्या कामांवरील अधीक्षण व नियंत्रण आयुक्ताकडे निहित असेल.

१९५९ चा मुंबई ५१. (२) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ याच्या कलम २१ अन्वये रचना करण्यात आलेले न्यायाधिकरण हे अपिलांची व पुनरीक्षण अर्जांची सुनावणी करण्याच्या व या अधिनियमाखालील न्यायाधिकरणाची इतर कामे पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी न्यायाधिकरण असेल आणि तदनुसार त्या अधिनियमाच्या कलम २१ च्या तरतुदी (आणि त्याखाली केलेले कोणतेही विनियमन, त्यात परिस्थितीनुसार काही फेरबदल आवश्यक असल्यास ते करून) आणि त्या अधिनियमाखालील न्यायाधिकरणाशी संबंधित इतर तरतुदी त्या अधिनियमांच्या प्रयोजनांसाठी अशा न्यायाधिकरणाला व त्याच्या संबंधात लागू होतील.

(३) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता राज्य शासनास, त्याच्या स्वेच्छा-निर्णयानुसार, विहित करण्यात येतील अशा व्यक्तींकडून किंवा व्यक्तींच्या वर्गाकडून या अधिनियमाअन्वये कर बसविण्यास व तो गोळा करण्यास जबाबदार असेल असा आपला एजंट म्हणून कोणताही शासकीय विभाग किंवा अधिकारी किंवा महानगरपालिका, नगरपालिका किंवा जिल्हा परिषद [२][किंवा कोणतीही एजन्सी] (यात यापुढे ज्यांना "वसुली एजंट" असे संबोधण्यात आले आहे) यांची नियुक्ती करता येईल ; आणि त्यानंतर विहित करण्यात येतील त्याप्रमाणे, या अधिनियमाखालील कामे, विहित रितीने पार पाडणे आणि बसविलेल्या व गोळा केलेल्या कराचा संपूर्ण हिशेब तो अधिकारी फर्माविल अशा रीतीने व अशा वेळी, आयुक्तास देणे हे अशा वसुली एजंटाचे कर्तव्य असेल.

[३][(४) या संबंधात वसुली एजंटाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला कर बसविण्याच्या आणि गोळा करणाऱ्या प्रयोजनांसाठी, विहित करण्यात येतील असे अधिकार असतील.]

(५) पोटकलम (३) अन्वये त्या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी एजंट म्हणून नियुक्त केलेल्या महानगरपालिकेस, नगरपालिकेस [४][जिल्हा परिषदेस किंवा एजन्सीस] राज्य शासन, [५][ * * * ] निर्धारित करील असा वसुलीचा खर्च देण्यात येईल.

---

[१]सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ५० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला आणि तो १० ऑगस्ट १९९२ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[२]सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ४३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम ४३(ब) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

[४]वरील अधिनियमांच्या कलम ४३(क) द्वारे "किंवा जिल्हा परिषदेस" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]वरील अधिनियमाच्या कलम ४३(क) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

(६) आयुक्ताने किंवा त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी वसुली एजंटाने ठेवलेली किंवा ठेवणे आवश्यक असलेली पुस्तके, नोंदवह्या, लेखे किंवा दस्तऐवज पाहणे आणि ते प्रस्तुत करण्याची व तपासण्याची व्यवस्था करणे कायदेशीर असेल आणि वसुली एजंट हा, तसे करण्यास सांगण्यात येईल तेव्हा, अशी पुस्तके, नोंदवह्या, लेखे किंवा दस्तऐवज, आयुक्ताकडून किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून तपासणी केली जाण्यासाठी सादर करील.

विवक्षित वादग्रस्त प्रश्नांचा निर्णय. [1][१२-अ. (१) एखाद्या न्यायालयापुढील कार्यवाहीत किंवा विहित प्राधिकाऱ्याने कलम ७ अन्वये एखाद्या मालकाच्या कर निर्धारणास सुरुवात करण्यापूर्वी असेल त्याखेरीज अन्यथा कलम २ मध्ये व्याख्या केलेल्या कोणत्याही शब्द प्रयोगाच्या किंवा अनुसूची एक मधील कोणत्याही नोंदीच्या अर्थविवरणासंबंधात किंवा तिच्या व्याप्तीच्या संबंधात कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, आयुक्त अशा प्रश्नांवर निर्णय देणारा आदेश काढील.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, जेव्हा एखाद्या मालकावर कलम ७ अन्वये नोटीस बजावली असेल तेव्हा, विहित प्राधिकाऱ्याने त्या कलमान्वये त्या मालकाच्या निर्धारणास सुरुवात केली असल्याचे समजण्यात येईल.

(२) अशा निर्णयामुळे कोणत्याही व्यक्तीच्या, निर्णयापूर्वीच्या कालावधीसंबंधातील, या अधिनियमाखालील दायित्वावर परिणाम होणार नाही, असा निदेश आयुक्त देऊ शकेल.

(३) या अधिनियमाखालील यापूर्वीच दिलेल्या कोणत्याही आदेशामधून असा कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, असा कोणताही प्रश्न या कलमाखाली निर्णयार्थ स्वीकारण्यात येणार नाही ; परंतु असा प्रश्न अशा आदेशाविरुद्धच्या अपिलामध्ये किंवा अशा आदेशाच्या पुनरीक्षणाच्या रूपाने उपस्थित करता येईल.]

अपील. १३. (१) राज्य शासनाकडून करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने कलमें ५, ६, ७, ९, १०, १५ किंवा १६ खाली काढलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे पीडित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा मालकास, अशा आदेशाविरुद्ध,—

(अ) जर कोणत्याही विहित प्राधिकाऱ्याने किंवा त्याच्या दुय्यम अधिकाऱ्याने आदेश काढलेला असेल तर, सहायक आयुक्ताकडे;

(ब) जर सहायक आयुक्ताने आदेश काढलेला असेल तर, उप आयुक्ताकडे ; आणि

(क) जर उप आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याने आदेश काढलेला असेल तर, न्यायाधिकरणाकडे ;

अपील करता येईल.

(२) मागणीची नोटीस मिळाल्याच्या किंवा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवस झाल्यानंतर कोणतेही अपील स्वीकारले जाणार नाही :

परंतु, विलंबास पुरेसे कारण असल्याबद्दल अपील प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास, वरील कालावधी समाप्त झाल्यानंतर त्यास अपील दाखल करून घेता येईल.

[2][(३) शास्तीसह किंवा व्याजासह किंवा त्याशिवाय असलेल्या कर निर्धारणाच्या आदेशाविरुद्ध अथवा शास्ती किंवा व्याज लादणाऱ्या आदेशाविरुद्ध करण्यात आलेल्या अपिलासोबत ज्याच्या संबंधात अपील दाखल करण्यात आलेले असेल ती शास्ती किंवा व्याज यांसह कर किंवा यथास्थिति शास्ती किंवा व्याज भरल्याचा समाधानकारक पुरावा जोडलेला असल्याखेरीज अपील प्राधिकरण सामान्यपणे असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही :

---

[1]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ८ अन्वये कलम १२-अ समाविष्ट करण्यात आले.

[2]सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ९ अन्वये पोटकलम (३) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

परंतु, अपील प्राधिकरणाला योग्य वाटले तर लेखी नमूद करावयाच्या कारणासाठी ते निदेश देईल त्याप्रमाणे, ज्याच्या संबंधात अपील दाखल करण्यात आलेले असेल त्या कराच्या शास्तीच्या किंवा व्याजाच्या रकमेच्या पंचवीस टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतकी रक्कम भरण्यात आल्यानंतर अशा आदेशाविरुद्ध केलेले अपील विचारार्थ स्वीकारता येईल.]

(४) अपील प्राधिकाऱ्यास, अपील निकालात काढताना,—

(एक) निर्धारित कर किंवा शास्ती किंवा व्याज कायम करता येईल, ते विलोपित करता येईल, कमी करता येईल, वाढवता येईल किंवा त्यात अन्य प्रकारे फेरबदल करता येईल; किंवा

(दोन) निर्धारित कर किंवा शास्ती किंवा व्याज रद्द करता येईल आणि ज्या प्राधिकाऱ्याने कर निर्धारित केला असेल किंवा शास्ती लादली असेल किंवा व्याज आकारले असेल त्या प्राधिकाऱ्यास विनिर्दिष्ट मुद्यांवर आणखी चौकशी केल्यानंतर, नवीन आदेश काढण्याबद्दल निदेश देता येईल.

(५) अपीलकाराला किंवा त्याच्या प्रतिनिधीला आणि अपील प्राधिकरण हे न्यायाधिकरण असेल त्या बाबतीत, ज्याचा आदेश किंवा निदेश हा अपिलाचा विषय असेल त्या प्राधिकाऱ्याला किंवा त्याच्या प्रतिनिधीला, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय या कलमाखाली कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

१४. (१) कलम १३ अन्वये अपिलावर दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पुनरीक्षण करण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल तर— पुनरीक्षण.

(अ) जर आदेश सहायक आयुक्ताकडून देण्यात आला असेल तर, उप आयुक्ताकडून ;

(ब) जर आदेश उप आयुक्ताकडून देण्यात आला असेल तर, न्यायाधिकरणाकडून ;

त्यांचे पुनरीक्षण करण्यात येईल.

(२) या कलमाच्या पोटकलम (१) अन्वये उप आयुक्ताने किंवा पोटकलम (४) अन्वये आयुक्ताने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे, [१][किंवा कलम १२-अ खाली आयुक्ताने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे, अशा आदेशाविरुद्ध न्यायाधिकरणाकडे अर्ज करण्यात आल्यावर न्यायाधिकरणास पुनरीक्षण करता येईल.]

(३) आदेश मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांनंतर, पोटकलम (१) किंवा (२) अन्वये कोणताही पुनरीक्षणाचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

(४) आयुक्तास, स्वतः होऊन न्यायाधिकरणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याने या अधिनियमाखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पुनरीक्षण करता येईल :

परंतु, आक्षेपित आदेश दिल्यापासून तीन वर्षांनंतर, या पोटकलमान्वये आयुक्त, कोणत्याही आदेशाचे पुनरीक्षण करणार नाही.

(५) अर्जदारास किंवा करपात्र व्यक्तीस स्वतःचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय या कलमाखाली कोणताही आदेश काढला जाणार नाही.

१५. (१) या अधिनियमाखालील कोणत्याही प्राधिकाऱ्यास स्वतः होऊन किंवा त्याबाबतीत अर्ज करण्यात आल्यानंतर, अभिलेखावर उघड दिसणारी कोणतीही चूक दुरुस्त करता येईल. चुकांची दुरुस्ती.

(२) जर कोणत्याही मालकाच्या बाबतीत कोणत्याही कालावधीसाठी अवनिर्धारण झाले असेल तर या अधिनियमाखालील कोणत्याही प्राधिकाऱ्यास स्वतःच्या आदेशाचे पुनर्विलोकन करता येईल :

---

[१]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, या कलमाखालील, कोणत्याही आदेशाचा एखाद्या मालकावर किंवा व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होत असेल, तर अशा मालकास किंवा व्यक्तीस स्वतःचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, कोणताही आदेश दिला जाणार नाही :

आणखी असे की, आक्षेपित आदेश देण्यात आल्यापासून तीन वर्षांनंतर या कलमाखाली कोणताही आदेश दिला जाणार नाही.

लेखे. १६. (१) मालकाने आपल्या धंद्याच्या नेहमीच्या ओघात ठेवलेली लेखापुस्तके आणि इतर कागदपत्रे ही मालकाने या अधिनियमाखाली सादर केलेल्या विवरणाच्या पडताळणीसाठी पुरेशी नाहीत अशी आयुक्ताची खात्री झाल्यास, तो लेखी निदेश देईल त्या रीतीने लेखापुस्तके आणि इतर कागदपत्रे ठेवण्याबाबत त्याने मालकास निदेश देणे कायदेशीर असेल आणि त्यानंतर, मालक लेखापुस्तके आणि इतर कागदपत्रे त्यानुसार ठेवील.

(२) पोटकलम (१) अन्वये निदेश दिल्याप्रमाणे लेखापुस्तके आणि इतर कागदपत्रे ठेवण्यात मालक बुद्धीपुरस्सर कसूर करील अशा बाबतीत, मालकास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आयुक्त, विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी पाच रुपयांपेक्षा जास्त नसेल इतकी शास्ती त्याच्यावर लादू शकेल.

वसुलीची विशेष पद्धत. १७. (१) कोणत्याही कायद्यात किंवा संविदेत एतद्विरुद्ध काहीही असले तरी, आयुक्तास, कोणत्याही वेळी किंवा वेळोवेळी, लेखी नोटीस देऊन, आणि नोटिशीची एक प्रत करपात्र व्यक्तींच्या माहीत असलेल्या अंतिम पत्त्यावर पाठवून—

(अ) या अधिनियमान्वये ज्या निर्धारितीवर मागणीची नोटीस बजावली आहे त्या निर्धारितीस जिच्याकडून रक्कम येणे असेल किंवा जिच्याकडून ती देणे होईल अशा कोणत्याही व्यक्तीस, किंवा

(ब) अशा निर्धारितीसाठी किंवा तिच्या वतीने जी व्यक्ती रक्कम धारण करीत असेल किंवा पुढे धारण करील अशा व्यक्तीस,

एकतर पैसा देय झाल्यानंतर किंवा धारण केल्यावर लगेच किंवा नोटिशीत विहित केलेल्या वेळी किंवा त्यावेळेच्या आत (परंतु पूर्वोक्त क्रमाने पैसा देय होण्यापूर्वी किंवा धारण करण्यापूर्वी नव्हे) या अधिनियमान्वये कराच्या, शास्तीच्या किंवा व्याजाच्या थकबाकीच्या बाबतीत निर्धारितीकडून येणे असलेली रक्कम भरण्यास पुरेसा असेल एवढा पैसा किंवा या रकमेइतकीच किंवा त्यापेक्षा कमी रक्कम असेल तर सर्व पैसा, आयुक्तास देण्यास फर्मावता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीकडून निर्धारितीला येणे असलेल्या किंवा निर्धारितीसाठी किंवा त्याच्या वतीने तिने धारण केलेल्या रकमेची गणना अशा निर्धारितीकडून अशा व्यक्तीला जी देय झाली असती अशी कायदेशीरपणे अस्तित्वात असलेली मागण्यांची रक्कम (तशी रक्कम असल्यास) वजा करून करण्यात येईल.

(२) आयुक्तास, कोणत्याही वेळी किंवा वेळोवेळी अशा नोटिशीत सुधारणा करता येईल किंवा नोटीस रद्द करता येईल किंवा त्या नोटिशीनुसार करावयाच्या कोणत्याही प्रदानाची मुदत वाढवून देता येईल.

(३) या कलमाअन्वये दिलेल्या नोटिशीनुसार प्रदान करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने केलेला कोणताही भरणा निर्धारितीच्या प्राधिकारानुसार केल्याचे मानण्यात येईल आणि आयुक्ताची पावती ही अशा व्यक्तीस तिच्या दायित्वामधून, पावतीमध्ये निर्देश केलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंत, मुक्त करण्यास पुरेशी असेल.

(४) या कलमात निर्देश केलेली नोटीस मिळाल्यानंतर निर्धारितीसंबंधीचे कोणतेही दायित्व चुकते करणारी कोणतीही व्यक्ती, ही चुकत्या केलेल्या दायित्वाच्या मर्यादेपर्यंत किंवा कर, शास्ती किंवा व्याज, यांपैकी जी रक्कम कमी असेल त्यासंबंधात असलेल्या करपात्र व्यक्तीच्या दायित्वाच्या मर्यादेपर्यंत, आयुक्तास व्यक्तीशः जबाबदार राहील.

(५) या कलमाअन्वये जिला नोटीस पाठवली असेल अशी व्यक्ती जर मागणी केलेली रक्कम किंवा तिचा कोणताही भाग हा करपात्र व्यक्तीस देणे नाही किंवा ती करपात्र व्यक्तीसाठी किंवा तिच्या वतीने कोणतीही रक्कम धारण करीत नाही याबद्दल आयुक्ताची खात्री पटेल अशा प्रकारे सिद्ध करील तर, या कलमातील कोणत्याही गोष्टींमुळे, त्या व्यक्तीने, ती रक्कम किंवा यथास्थिति तिचा भाग आयुक्तास देणे आवश्यक आहे, असे मानण्यात येणार नाही.

(६) आयुक्ताकडे कोणत्याही व्यक्तीने भरणा करणे आवश्यक असलेली रक्कम किंवा ज्यासाठी या कलमाखाली ती व्यक्ती आयुक्तास व्यक्तिशः जबाबदार असेल अशी रक्कम जर देण्यात आली नाही तर ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असेल.

**लेखे व दस्तऐवज सादर करणे व त्यांची तपासणी आणि जागांची झडती.**

१८. या अधिनियमाखालील कोणत्याही प्राधिकाऱ्यास या अधिनियमान्वये कराधानास पात्र असलेला कोणताही व्यवसाय, व्यापार, आजीविका किंवा नोकरी जेथे चालत असेल किंवा जेथे चालत असल्याचा संशय असेल अशा कोणत्याही जागांची तपासणी करता येईल व झडती घेता येईल आणि त्या संबंधातील कोणतीही पुस्तके, नोंदवह्या, लेखे किंवा दस्तऐवज सादर करण्याची आणि त्यांची तपासणी करण्याची व्यवस्था करता येईल आणि आवश्यक असतील अशी पुस्तके, नोंदवह्या, लेखे किंवा दस्तऐवज जप्त करता येतील :

परंतु, उक्त प्राधिकारी उक्त जागांमधून कोणतेही पुस्तक, नोंदवही, लेखा किंवा दस्तऐवज काढून नेईल त्याबाबतीत, तो अशा रीतीने काढून नेलेले पुस्तक, नोंदवही, लेखा किंवा दस्तऐवज यांचे वर्णन असलेली एक पावती त्या जागेच्या प्रभारी व्यक्तीस देईल आणि तपासणीच्या किंवा खटल्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असेल तोपर्यंतच केवळ तो असे पुस्तक, नोंदवही, लेखा किंवा दस्तऐवज स्वतःकडे ठेवील.

**जादा प्रदानांचा परतावा.**

[1][१९. एखाद्या व्यतीने, कर, शास्ती, व्याज व फी (कोणतीही असल्यास) यांची रक्कम तिच्या-कडून देय असलेल्या रकमेपेक्षा जास्त दिली असेल तर, विहित प्राधिकारी तिला त्या रकमेचा परतावा देईल. असा परतावा हा, एकतर रोख प्रदानाद्वारे करता येईल किंवा त्या व्यक्तीच्या विकल्पानुसार इतर कोणत्याही कालावधीच्या संबंधातील देय कर, शास्ती, व्याज व फी यांच्या रकमेतून अशी जादा रक्कम वजा करुन, करता येईल :

परंतु, विहित प्राधिकारी अशी जादा रक्कम प्रथम कलम ७ खाली जिच्या संबंधात नोटीस बजावण्यात आली असेल अशा देय रकमेच्या वसुलीसाठी उपयोजित करील आणि त्यानंतर कोणतीही शिल्लक राहिल्यास तिचा परतावा देईल. ]

**अपराध आणि शास्ती.**

२०. जी कोणतीही व्यक्ती किंवा मालक या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे पालन करण्यात पुरेसे कारण नसताना कसूर करील ती व्यक्ती किंवा मालक, अपराधसिद्धीनंतर, पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसणाऱ्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि अपराध चालू राहणारा असेल तेव्हा तो अपराध चालू असेल अशा मुदतीतील प्रत्येक दिवसासाठी, पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**कंपन्यांनी केलेले अपराध.**

२१. (१) या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्या बाबतीत अपराध घडला त्यावेळी कंपनीची प्रभारी असेल आणि जी कंपनीचा कारभार चालविण्यासाठी कंपनीस जबाबदार असेल अशी प्रत्येक व्यक्ती तसेच कंपनी ही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि ती तिच्याविरुद्ध खटला भरला जाण्यास आणि तदनुसार शिक्षा होण्यास पात्र ठरेल :

परंतु, अपराध आपल्या नकळत झाला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्व यथोचित दक्षता घेतली होती असे जर त्या व्यक्तीने सिद्ध केले तर, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती अशी कोणतीही शिक्षा होण्यास पात्र ठरणार नाही.

---

[1]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १० अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध एखाद्या कंपनीकडून झालेला असेल तर आणि तो कंपनीचा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा किंवा हयगय केल्यामुळे झाला असे सिद्ध करण्यात येईल त्या बाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तो त्याच्याविरुद्ध खटला भरला जाण्यास आणि तदनुसार शिक्षा होण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(अ) "कंपनी" याचा अर्थ कोणताही निगमनिकाय असा होतो आणि त्यामध्ये एखादी भागीदारी संस्था किंवा व्यक्तींची इतर संघटना यांचा समावेश होतो ; आणि

(ब) भागीदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ भागीदारी संस्थेतील भागीदार असा होतो.

**कार्यवाही हस्तांतरित करण्याचा अधिकार.**

२२. पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, तसे करणे शक्य असेल तेव्हा आणि तसे करण्याबद्दलचे आपले कारण अभिलिखित केल्यानंतर, आयुक्तास, लेखी आदेशाद्वारे, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीखालील कोणत्याही कार्यवाहीचे किंवा कार्यवाहीच्या वर्गाचे हस्तांतरण स्वतःकडून इतर कोणत्याही अधिकाऱ्यांकडे करता येईल आणि त्यास अशा कोणत्याही कार्यवाहीचे (कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेली किंवा या कलमाखाली आधीच हस्तांतरित करण्यात आलेली कार्यवाही धरून) कोणत्याही अधिकाऱ्यांकडून इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा स्वतःकडे तसेच हस्तांतरण करता येईल :

परंतु, हस्तांतरण हे कोणत्याही अधिकाऱ्याकडून दुसऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे असेल आणि त्या दोघांचीही कार्यालये एकाच शहरात, एकाच वस्तीत किंवा एकाच ठिकाणी असतील त्याबाबतीत या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही संधी देण्याची आवश्यकता असल्याचे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण**.—या कलमान्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशात जिचे नाव विनिर्दिष्ट करण्यात आले आहे अशा कोणत्याही करपात्र निर्धारितीच्या संबंधात "कार्यवाही" याचा अर्थ कोणत्याही वर्षाच्या संबंधात या अधिनियमाखालील अशा आदेशाच्या तारखेस ज्या प्रलंबित असतील किंवा ज्या अशा तारखेस किंवा तत्पूर्वी पूर्ण झाल्या असतील अशा सर्व कार्यवाह्या आणि त्यामध्ये, अशा करपात्र निर्धारितीच्या बाबतीत कोणत्याही वर्षाच्या संबंधात अशा आदेशाच्या तारखेनंतर ज्या सुरू होतील अशा या अधिनियमाखालील सर्व कार्यवाह्यांचा देखील समावेश होतो.

**अपराध आपसात मिटवणे.**

२३. (१) विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून आयुक्तास, या अधिनियमाखालील अपराधांबाबतची कार्यवाही एकतर दाखल करण्यापूर्वी किंवा ती दाखल केल्यानंतर, ज्या कराच्या रकमेबाबत अपराध घडला असेल त्या कराच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल इतकी, आयुक्त ठरवील ती रक्कम दिल्यानंतर, अपराधाचा दोषारोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीस तो अपराध आपसात मिटविण्यास परवानगी देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आयुक्तांकडून ठरविण्यात येईल अशी रक्कम दिल्यानंतर, त्याच अपराधाच्या संबंधात त्या व्यक्तींविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

**हजर राहण्यास भाग पाडणे, इत्यादी-बाबतचे अधिकार.**

२४. कोणत्याही व्यक्तीला हजर राहण्यास आणि तिची शपथेवर किंवा दृढकथनावर तपासणी करण्यास भाग पाडण्याच्या संबंधात किंवा कोणताही दस्तऐवज सादर करण्यास सक्ती करण्याच्यासंबंधात दाव्याची न्याय चौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खाली न्यायालयामध्ये जे अधिकार निहित असतात तेच अधिकार या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमाखालील सर्व प्राधिकाऱ्यांना असतील. १९०८ चा ५.

**कार्यवाहीस रोध.**

२५. (१) या अधिनियमाअन्वये करण्यात आलेले कोणतेही निर्धारण किंवा दिलेला कोणताही आदेश रद्द करण्याकरिता किंवा त्यात फेरबदल करण्याकरिता, कोणत्याही दिवाणी न्यायालयात कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

(२) या अधिनियमाअन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमाअन्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल या अधिनियमाखाली कोणत्याही प्राधिकाऱ्याविरुद्ध किंवा कोणत्याही मालकाविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही.

२६. राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे लादील अशा शर्तींच्या व निर्बंधाच्या अधीन राहून आयुक्तास, लेखी आदेशाद्वारे सामान्यत: किंवा कोणत्याही विशिष्ट बाबींच्या किंवा बाबींच्या कोणत्याही विशिष्ट वर्गाच्या संबंधात या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार आपल्या दुय्यम प्राधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील. प्रत्या-योजनाचा अधिकार.

२७. (१) या अधिनियमाखालील सर्व नियम करण्याच्या अधिकारांचा, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वापर करता येईल. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमात इतरत्र असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न येऊ देता राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने सामान्यत: पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असतील असे नियम करता येतील आणि या अधिनियमाअन्वये करावयाचे कोणतेही अर्ज, पुरवावयाचे नमुने, मंजूर करावयाची प्रमाणपत्रे आणि अपीले व पुनरीक्षणासंबंधीचे अर्ज [१][आणि तसेच, दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रतींसाठी केलेले कोणतेही अर्ज आणि या अधिनियमान्वये काढलेले आदेश] यांच्या बाबतीत देय असणारी फी विहित करता येईल.

(३) या अधिनियमाअन्वये केलेले नियम, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन असतील :

परंतु, जिच्यामुळे तावडतोब कारवाई करणे आवश्यक ठरते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्या-बद्दल राज्य शासनाची खात्री झाल्यास, या अधिनियमाखाली करावयाचे कोणतेही नियम त्यास, पूर्वप्रसिद्धीशिवायही करता येतील.

(४) या कलमाअन्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधान-मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील आणि असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखे-पासून अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच नियम अंमलात येईल किंवा यथास्थिति अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमाखाली पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

[२][२७-अ. कलम ३ मध्ये आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदींमध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट— सूट.

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ११ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[१][(अ) राज्याच्या कोणत्याही भागामध्ये नोकरी करणारे व यथास्थिति भूसेना, वायुसेना १९५० चा
किंवा नौसेना कर्मचारी म्हणून वेतन व भत्ते घेणारे, भूसेना अधिनियम, १९५० किंवा वायुसेना ४६.
अधिनियम, १९५० यात व्याख्या करण्यात आलेले सशस्त्र दलाचे सदस्य व नौसेना अधिनियम, १९५० चा
१९५७ यात व्याख्या केलेले भारतीय नौसेनेचे सदस्य आणि यामध्ये सहाय्यकारी सशस्त्र ४५.
दलाच्या किंवा राखीव सेना दलाच्या सदस्यांचा किंवा राज्याच्या कोणत्याही भागामध्ये नोकरी १९५७ चा
करणारे व अशा सहाय्यकारी सशस्त्र दलातील किंवा राखीव सेना दलातील सदस्य म्हणून ६२.
वेतन व भत्ते घेणारे राखीव व सहाय्यकारी सेवेतील कर्मचारी किंवा संरक्षण सेवेच्या अर्थ-
संकल्पीय वाटपान्वये यथास्थिति राखीव व सहाय्यकारी सेवेतील सदस्य, यांचा समावेश होतो ; ]

[२][(अ-१) राज्याच्या कोणत्याही भागातील संरक्षण सेवा सामग्री कारखान्यांच्या आस्थापनेवरील व्यक्ती; ]

(ब) वस्त्र निर्माण उद्योगातील बदली कामगार.].

[३][(क) राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमामध्ये कायमस्वरूपी अपंगत्व म्हणून विनिर्दिष्ट केलेले आणि शासकीय रुग्णालयात काम करणारा भिषक, शल्यचिकित्सक किंवा नेत्ररोगतज्ञ याने प्रमाणित केलेले आणि अशा व्यक्तींची काम करण्याची किंवा लाभदायक नोकरीत किंवा व्यवसायात कामावर लावण्यासाठीची सर्वसाधारण क्षमता लक्षणीयपणे कमी करण्याचा प्रभाव असलेले शारीरिक कायमस्वरूपी अपंगत्व (अंधत्वासह) असलेली कोणतीही व्यक्ती :

परंतु, अशी व्यक्ती किंवा यथास्थिति मालक या पोट-कलमाअन्वये ज्यासाठी वजातीची मागणी करील अशा पहिल्या आकारणी वर्षाच्या संबंधात विहित प्राधिकरणापुढे उपरोक्त प्रमाणपत्र सादर करील :

आणखी असे की, ज्या व्यक्तीने १ एप्रिल १९९५ च्या लगतपूर्वी असतील अशा या पोट-कलमाच्या तरतुदींअन्वये यापूर्वीच विहित प्राधिकरणाकडे प्रमाणपत्र सादर केले असेल तिला, शासकीय रुग्णालयात काम करणाऱ्या भिषकाकडील, शल्यचिकित्सकाकडील किंवा यथास्थिति नेत्रोपचारतज्ञाकडील प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी "शासकीय रूग्णालय" या संज्ञेमध्ये एखाद्या शासकीय विभागाकडून शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्गाच्या किंवा वर्गांच्या आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या वैद्यकीय परिचर्येसाठी आणि उपचारासाठी चालविण्यात येणारा पूर्णकालिक किंवा अंशकालिक विभागीय दवाखाना, शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपचारासाठी जेथे व्यवस्था केली आहे असे स्थानिक प्राधिकरणाकडून चालविण्यात येणारे रूग्णालय आणि अन्य कोणतेही रुग्णालय, यांचा समावेश होतो ; ] ;

[४][(ड) अल्पबचत संचालनालयाच्या "महिला प्रधान क्षेत्रिय बचत" योजनेखाली एजंट म्हणूनच केवळ काम करणाऱ्या महिला.]

---

[१]सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २, मूळ खंड (अ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला आणि १ नोव्हेंबर १९७६ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[२]सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ४४(अ) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३]सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १८ अन्वये मूळ खंड (क) ऐवजी हा खंड १ एप्रिल १९९५ पासून दाखल करण्यात आला.

[४]सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३३ अन्वये खंड (ड) समाविष्ट करण्यात आला.

[1][2][(ई) मतिमंदांसंबंधी तयार करण्यात आलेल्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले आणि शासकीय रुग्णालयामध्ये काम करणाऱ्या मनोविकृति चिकित्सकाने प्रमाणित केलेले मति-मंदत्व असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे माता-पिता किंवा पालक :

परंतु, या कलमान्वये वजातीची मागणी करणारी व्यक्ती अशा पहिल्या आकारणी वर्षाच्या संबंधात विहित प्राधिकरणाकडे असे प्रमाणपत्र सादर करील.

स्पष्टीकरण.—या खंडाच्या प्रयोजनासाठी "शासकीय रुग्णालय" या संज्ञेला तिला खंड (क) मध्ये जो अर्थ दिला असेल तोच अर्थ असेल.] ;

[ (फ) वयाची पासष्ट वर्षे जिने पूर्ण केली आहेत अशी व्यक्ती. ]

[3][ (ग) खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे शारीरिक अपंगत्वाने पिडीत असलेल्या मुलाचे आई-वडील किंवा पालक; ] .

**विवक्षित अधिनियमांची सुधारणा.**

२८. (१) अनुसूची दोनच्या दुसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेले अधिनियम, हे, उक्त अनु-सूचीच्या तिसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि त्या मर्यादेपर्यंत, याद्वारे सुधारण्यात येत आहेत :

परंतु,—

(एक) या सुधारणा अंमलात येण्याच्या तारखेपूर्वीच्या कोणत्याही कालावधीच्या संबंधात केलेल्या किंवा करू दिलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, पूर्वीच संपादित केलेला हक्क, उपार्जित आबंधन किंवा पत्करलेले दायित्व,

(दोन) या सुधारणा अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी किंवा त्यानंतर, असा कोणताही हक्क, असे कोणतेही आबंधन किंवा दायित्व यासंबंधात सुरू केलेली कोणतीही न्यायालयीन कार्यवाही किंवा लाभ घेतलेली कोणतीही उपाययोजना,—

यावर उक्त सुधारणांमधील कोणत्याही मजकुराचा परिणाम होणार नाही किंवा परिणाम होत असल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) संबंद्ध अधिनियमाच्या तरतुदीअन्वये अशा कालावधीच्या संबंधात, कोणताही कर बसविणे, त्याचे निर्धारण किंवा वसुली करणे किंवा कोणतीही शास्ती लादणे किंवा तिची वसुली करणे आणि उपरोक्त सर्व बाबींच्या संबंधात उक्त अधिनियमाखालील सर्व कामकाज हे, जणू हा अधि-नियम अधिनियमित झाला नसल्याप्रमाणे, सुरू करण्यात व निकालात काढण्यात येईल किंवा यथास्थिति चालू ठेवण्यात किंवा निकालात काढण्यात येईल.

**महसुलातील तुटीबद्दल स्थानिक प्राधिकरणांना अनुदाने.**

२९. या अधिनियमाअन्वये वसूल करण्यात आलेले कर व शास्ती आणि व्याज व फी यापासून मिळालेल्या उत्पन्नातून, जी स्थानिक प्राधिकरणे, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी व्यवसाय, व्यापार, आजीविका आणि नोकऱ्या यांवरील कर वसूल करीत होती आणि असा कर वसूल करण्याचा ज्याचा अधिकार या अधिनियमाच्या तरतुदींखाली काढून घेण्यात आला आहे अशा प्राधिकरणांना, कायद्याप्रमाणे यथोचितरित्या केलेल्या विनियोजनाद्वारे, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी तीन वर्षांच्या कालावधीतील कोणत्याही वर्षात त्यांनी केलेल्या अधिकतम वसुलीच्या आधारे या बाबतीत राज्य शासन ठरवील अशा रकमा दरवर्षी देण्यात येतील.

---

[1]सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ५१ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले व ते १ एप्रिल १९९५ पासून समाविष्ट केल्याचे मानण्यात येईल.

[2]सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, याच्या कलम १९, द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड १ एप्रिल १९९५ पासून दाखल करण्यात आला.

[3]सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ४४(ब) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[3][महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये स्थापन केलेल्या निधीत कराच्या निव्वळ उत्पन्नाइतकी रक्कम व अनुरुप अंशदान देणे.]

३०. (१) [1]* * * * * या अधिनियमान्वये वसूल करण्यात आलेल्या शास्ती, व्याज व फी यांसह त्याखाली बसविण्यात व वसूल करण्यात आलेल्या करांचे उत्पन्न, प्रथम राज्याच्या एकत्रित निधीत जमा करण्यात येईल आणि राज्य शासनाकडून निश्चित करण्यात आलेला कर गोळा करण्याचा व वसुलीचा खर्च व कलम २९ खाली स्थानिक प्राधिकरणांना द्यावयाच्या अनुदानाची रक्कम त्यातून वजा करून, उर्वरित रक्कम, या बाबतीतील कायद्याप्रमाणे यथोचितरित्या केलेल्या विनियोजनाद्वारे त्या निधीखाली समाविष्ट करण्यात येईल व [2][महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ खाली स्थापन केलेल्या रोजगार हमी निधीकडे.] हस्तांतरित करण्यात येईल. १९७८ चा महाराष्ट्र २०.

(२) या बाबतीतील कायद्याप्रमाणे यथोचितरित्या केलेल्या विनियोजनाद्वारे राज्य शासन, दरवर्षी [4][पोट-कलम (१) खाली त्या निधीकडे हस्तांतरित केलेल्या रकमेइतके अंशदान रोजगार हमी निधीस] देईल.

[5]* * * * * *

---

[1]सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १३, अनुसूची अन्वये "या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यावर" या शब्दांनी सुरू होणारा व "स्थापना करण्यात येईल" या शब्दांनी संपणारा भागांश वगळण्यात आला.

[2]वरील अधिनियमाच्या कलम १३ अनुसूची अन्वये "त्या निधीकडे हस्तांतरित" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3]वरील अधिनियमाच्या कलम १३ अनुसूची अन्वये मूळ समास टीपेऐवजी ही टीप दाखल करण्यात आली.

[4]वरील अधिनियमाच्या कलम १३ अनुसूची अन्वये "पोट-कलम १ खाली निधीकडे हस्तांतरित केलेल्या रकमेइतक्या रकमेचे अंशदान त्या निधीस" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5]वरील अधिनियमाच्या कलम १३ अनुसूची अन्वये पोट-कलमे (३), (४), (५) व (६) वगळण्यात आली.

[1][अनुसूची एक

(कलम ३ पहा)

व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कराच्या दरांची अनुसूची.

| अनुक्रमांक (१) | व्यक्तीचा वर्ग (२) | कराचा दर (३) |
|---|---|---|
| | भाग एक | रुपये |
| १ | वेतनदार व मजुरी मिळविणारे : ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी— | |
| | (अ) २,००० रुपयांहून अधिक नाही .. .. | काही नाही. |
| | (ब) २,००० रुपयांहून अधिक परंतु २,५०० रुपयांहून अधिक नाही .. | दरमहा ३० |
| | (क) २,५०० रुपयांहून अधिक परंतु ३,५०० रुपयांहून अधिक नाही .. | दरमहा ४० |
| | (ड) ३,५०० रुपयांहून अधिक परंतु ५,००० रुपयांहून अधिक नाही .. | दरमहा ६० |
| | (ई) रुपये ५,००० पेक्षा अधिक .. .. .. | दरमहा ८० |
| २ | (अ) सॉलिसिटर व लेखप्रमाणक यांच्यासह विधि व्यवसायी; | |
| | (ब) वैद्यक संमंत्रक व दंतवैद्यक यांच्यासह वैद्यक व्यवसायी; | |
| | (क) वास्तुशास्त्रज्ञ, अभियंते, आर.सी.सी. संमंत्रक, नळ कारागीर, कर संमंत्रक, सनदी लेखापाल, विमागणक व व्यवस्थापक संमंत्रक यांसह तांत्रिक व व्यावसायिक संमंत्रक; | |
| १९३८ चा ४. | (ड) विमा अधिनियम, १९३८ अन्वये नोंदणी केलेले किंवा लायसन मिळालेले मुख्य एजंट, प्रमुख एजंट, विशेष एजंट, विमा एजंट व सर्वेक्षक किंवा हानि निर्धारक, भारतीय युनिट ट्रस्टच्या योजनेखालील भारतीय युनिट ट्रस्ट एजंट, पोस्टाच्या योजनेखालील राष्ट्रीय बचत योजना एजंट; | |
| | (ई) (या अनुसूचीत अन्यत्र इतर कोणत्याही नोंदीमध्ये समाविष्ट केलेले इस्टेट ब्रोकर वगळून) अडत्ये, दलाल व ब्रोकर; | |
| | (फ) (या अनुसूचीत अन्यत्र इतर कोणत्याही नोंदीमध्ये समाविष्ट केलेले बांधकाम कंत्राटदार वगळून) सर्व प्रकारचे कंत्राटदार; | |
| | (ग) हिरा संस्कारक व हिरा झिलईकार. | |
| | उपरिनिर्दिष्ट कोणतीही व्यक्ती तिच्या व्यवसायात :— | |
| | (अ) दोन वर्षांपेक्षा कमी काळ असेल त्याबाबतीत .. | काही नाही. |
| | (ब) दोन वर्षे किंवा त्याहून अधिक काळ असेल त्याबाबतीत .. | दरसाल १,००० |
| १९५२ चा ७४. ३ | (अ) भावी संविदा (विनियमन) अधिनियम, १९५२ अन्वये मान्यता-प्राप्त संघटनांचे सदस्य. | दरसाल १,००० |
| १९५६ चा ४२. | (ब) (एक) प्रतिभूति संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ अन्वये मान्यता प्राप्त रोखे बाजाराचे सदस्य. | दरसाल १,००० |
| | (दोन) रोखे बाजाराकडून मान्यताप्राप्त अवसर्जक ( Temisier ) | दरसाल १,००० |

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ३४ द्वारे मूळ अनुसूची एक ऐवजी ही अनुसूची दाखल करण्यात आली.

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रुपये | |
| ४ | इस्टेट एजंट किंवा ब्रोकर किंवा बांधकाम कंत्राटदार .. .. | दरसाल १,००० | |
| ५ | कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी केलेल्या कंपन्यांचे संचालक .. (शासनाने नामनिर्देशित केलेल्या संचालकां व्यतिरिक्त).<br>स्पष्टीकरण.—या नोंदीच्या प्रयोजनार्थ "संचालक" या संज्ञेमध्ये ज्या कंपन्यांची नोंदणीकृत कार्यालये महाराष्ट्र राज्याच्या बाहेर आहेत त्या कंपन्यांचे संचालक असलेल्या व महाराष्ट्र राज्यात रहात नसलेल्या अशा व्यक्तींचा समावेश होणार नाही. | दरसाल १,००० | १९५६ चा १. |
| ६ | (अ) रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड यांच्याकडून लायसनप्राप्त बुकमेकर व अश्वप्रशिक्षक. | दरसाल १,००० | |
| | (ब) उक्त क्लबकडून लायसनप्राप्त जॉकी .. .. | दरसाल १,००० | |
| ७ | पुढीलप्रमाणे चलचित्र उद्योगातील स्वत:चा रोजगार असलेल्या व्यक्ती :— | | |
| | (अ) लेखक, गीतकार, दिग्दर्शक, अभिनेते व अभिनेत्री (कनिष्ठ कलाकार वगळून), संगीतकार, पार्श्वगायक, छायाचित्रक चालक, ध्वनिमुद्रक, संकलक व स्थिर छायाचित्रकार. | दरसाल १,००० | |
| | (ब) कनिष्ठ कलाकार, निर्मिती व्यवस्थापक, सहायक दिग्दर्शक, सहायक छायाचित्रक चालक, सहायक ध्वनिमुद्रक, सहायक संकलक, नर्तक. | दरसाल ३०० | |
| ८ | मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ खाली नोंदणी केलेले व्यापारी किंवा केवळ केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ खाली नोंदणी केलेले व्यापारी. | दरसाल १,००० | १९५९ चा मुंबई ५१. १९५६ चा ७४. |
| ९ | कारखाना अधिनियम, १९४८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले नोंद क्र. ८ मध्ये समावेश न केलेले कारखान्याचे भोगवटादार. | दरसाल १,००० | १९४८ चा ७३. |
| १० | (१) (अ) मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ मध्ये व्याख्या केल्यानुसार असलेले व नोंद क्र. ८ मध्ये समावेश न केलेले, ज्यांच्या आस्थापना उक्त अधिनियम लागू असलेल्या क्षेत्रात आहेत अशा आस्थापनांचे नियोक्ते, अशा अस्थापनांच्या नियोक्त्यांपैकी,— | | १९४८ चा मुंबई ७९. |
| | (अ) कोणताही कर्मचारी सेवेत नियुक्त केलेला नसेल, किंवा दोनपेक्षा अधिक नाही एवढे कर्मचारी सेवेत नियुक्त केलेले असतील त्याबाबतीत. | दरसाल ३०० | |
| | (ब) दोनपेक्षा अधिक कर्मचारी सेवेत नियुक्त केलेले असतील त्याबाबतीत. | दरसाल १,००० | |

| (१) | | (२) | (३) |
|---|---|---|---|
| | | | रुपये |
| १९४८ चा मुंबई ७९. | | (ब) मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ मध्ये व्याख्या केल्यानुसार असलेले असे नोंद क्र. ८ मध्ये समावेश न केलेले आस्थापनांचे नियोक्ते व ज्यांच्या आस्थापना उक्त अधिनियम लागू असलेल्या क्षेत्रात नाहीत अशा आस्थापना नियोक्त्यांपैकी,— | |
| | | (अ) कोणताही कर्मचारी सेवेत नियुक्त केलेला नसेल, किंवा दोन-पेक्षा अधिक नाही एवढे कर्मचारी सेवेत नियुक्त केलेले असतील त्या बाबतीत. | दरसाल ३०० |
| | | (ब) दोनपेक्षा अधिक कर्मचारी सेवेत असतील त्या बाबतीत .. | दरसाल ८५० |
| | | (२) केबल चालक आणि व्हिडिओ किंवा ऑडिओ पार्लर्स अथवा व्हिडिओ किंवा ऑडिओ कॅसेट लायब्रऱ्या चालवणारे. | दरसाल १,००० |
| | | (३) शासनाच्या किंवा अपंग व्यक्तीच्या मालकीचे/किंवा त्यांच्याद्वारे चालविण्यात येणाऱ्या एसटीडी/आयएसडी बुथव्यतिरिक्त एसटीडी/आयएसडी बुथचे मालक/ते चालविणाऱ्या व्यक्ती. | दरसाल १,००० |
| | ११ | तेल पंप व संधारण केंद्रे यांचे मालक (किंवा पट्टेदार) .. | दरसाल १,००० |
| १९४८ चा मुंबई ७९. | १२ | मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ मध्ये व्याख्या केल्या-प्रमाणे असलेले लायसन्सप्राप्त विदेशी दारू विक्रेते व निवासी हॉटेले व चित्रपटगृहे यांचे नियोक्ते. | दरसाल १,००० |
| १९८८ चा ५९. | १३ | मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये भाड्यादाखल किंवा मोबदल्यादाखल वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्यासाठी योग्य तो बदल करून घेतलेल्या वाहतुकीच्या वाहनांचे परवाने देण्यात आलेले धारक. अशी कोणतीही व्यक्ती ही कोणतीही टॅक्सी, माल वाहून नेण्याची तिचाकी किंवा चौचाकी वाहने, मालमोटारी किंवा बस-गाड्या यांचा परवाना किंवा परवाने धारण करीत असेल अशा बाबतीत—प्रत्येक वाहनासाठी | दरसाल ३०० |
| | | परंतु, या नोंदीअन्वये धारकाकडून देय होणारा एकूण कर दरसाल रु. १,००० पेक्षा अधिक होणार नाही. | |
| १९४७ चा मुंबई २१. | १४ | मुंबई सावकार अधिनियम, १९४६ अन्वये लायसन देण्यात आलेले सावकार. | दरसाल १,००० |
| | १५ | चिट फंड चालविणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था .. .. | दरसाल १,००० |
| १९६१ चा महा. २४. | १६ | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केल्याचे समजण्यात आलेल्या, आणि कोणतेही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका यांत गुंतलेल्या सहकारी संस्था— | |
| | | (एक) राज्य पातळीवरील संस्था .. .. .. | दरसाल १,००० |
| | | (दोन) सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्या .. .. | दरसाल १,००० |
| | | (तीन) जिल्हा पातळीवरील संस्था .. .. .. | दरसाल ३०० |

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रुपये | |
| १७ | बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ मध्ये व्याख्या केल्यानुसार असलेल्या बँक व्यवसाय कंपन्या. | दरसाल १,००० | १९४९ चा १०. |
| १८ | कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी केलेल्या व कोणतेही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका यांत गुंतलेल्या कंपन्या. | दरसाल १,००० | १९५६ चा १. |
| १९ | कोणतेही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका यांत गुंतलेल्या भागीदारी संस्थेचा (मग ती भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ अन्वये नोंदणीकृत असो किंवा नसो) प्रत्येक भागीदार. | दरसाल १,००० | १९३२ चा ९. |
| २० | कोणतेही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका यांत गुंतलेल्या व्यवसाय संस्था (मग त्या भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ अन्वये नोंदणीकृत असोत किंवा नसोत.) | दरसाल १,००० | १९३२ चा ९. |
| २१ | कोणतेही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका यांत गुंतलेले हिंदू अविभक्त कुटुंब. | दरसाल १,००० | |
| २२ | कोणतेही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका यांत गुंतलेल्या हिंदू अविभक्त कुटुंबाचा (अज्ञान नसलेला) प्रत्येक सहदायाद. | दरसाल १,००० | |
| २३ | कोणतेही व्यवसाय, व्यापार, आजीविका किंवा नोकऱ्या यांत गुंतलेल्या आणि ज्यांच्या बाबतीत कलम ३(२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये अधिसूचना काढण्यात आली असेल अशा, यापूर्वीच्या कोणत्याही नोंदीमध्ये निर्देश करण्यात आलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त इतर व्यक्ती] | दरसाल १,००० | |

भाग दोन

या अनुसूचीत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी या अनुसूचीच्या एकापेक्षा अधिक नोंदीमध्ये व्यक्तीचा समावेश करण्यात आला असेल त्या बाबतीत, त्या नोंदीपैकी कोणत्याही नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कराचा कमाल दर तिच्या बाबतीत लागू होईल.]

## अनुसूची दोन

(कलम २८ पहा)

| अनुक्रमांक (१) | अधिनियमांचे संक्षिप्त नाव व क्रमांक (२) | सुधारणा (३) |
|---|---|---|
| १ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम ५९). | कलम १२७, पोट-कलम (२) मधील,— (अ) खंड (ब) वगळण्यात येईल; (ब) खंड (फ) मध्ये "कोणताही इतर कर" या शब्दानंतर "(व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील करांव्यतिरिक्त)" हा मजकूर व कंस समाविष्ट करण्यात येईल. |
| २ | नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत आणि वऱ्हाड अधिनियम दोन). | कलम ११४, पोट-कलम (२) मधील,— (अ) खंड (अ) वगळण्यात येईल ; (ब) खंड (ग) मध्ये "कोणताही इतर कर" या शब्दानंतर "(व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील करांव्यतिरिक्त)" हा मजकूर व कंस समाविष्ट करण्यात येईल. |
| ३ | मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम ३). | कलम १२४ मधील पोट-कलम (४) वगळण्यात येईल. |
| ४ | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५). | (अ) कलम १५७ मधील खंड (अ) वगळण्यात येईल. (ब) कलमे १६३ आणि १६४ वगळण्यात येतील. |
| ५ | महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम, ४०). | (अ) कलम १०५, पोट-कलम (१) मधील खंड (क) वगळण्यात येईल. (ब) कलम १०८, खंड (आय) मध्ये "कोणताही इतर कर" या मजकुरानंतर "(व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या)" हा मजकूर व कंस समाविष्ट करण्यात येईल. |

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.